# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

## टाइम्स इनोव्हेटिव्ह मीडिया मिळाला मुंबई मेट्रो तीन च्या बाह्य जाहिरातींचा कंत्राट

**मुंबई, २२ जुलै, २०२४** – मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने टाइम्स इनोव्हेटिव्ह मीडिया लिमिटेडला पंधरा वर्षाच्या कालावधीसाठी बाह्य जाहिरातीचा अधिकाराचा परवाना दिला आहे. यामध्ये २७ स्थानके ३१ गाड्या, अन्सिलरी इमारतींमधील एकूण वीस हजार चौरस मीटर जागेसह स्थानकांच्या नाम अधिकारांचाही समावेश आहे.

मुं.मे.रे.कॉ. ने यापूर्वी स्थानक नाम अधिकार, टेलिकॉम इन-बिल्डिंग सोल्यूशन्स, ऑप्टिकल फायबर केबल्सच्या निविदा काढल्या आहेत. सुमारे दीड लाख चौरस फुटांच्या व्यावसायिक जागांच्या परवान्यासाठीच्या निविदा खुल्या आहेत व त्यास उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. मुं.मे.रे.कॉने ऑक्टस ॲडव्हायझर्स-स्टुडिओ POD कन्सोर्टियम यांना सर्व मेट्रो-३ चाय नॉन-फेअर बॉक्स द्वारे होणाऱ्या महसूल प्राप्ती साठी करण्यात येणाऱ्या विविध कामांसाठी सल्लागार म्हणून नेमले आहे.

मुंबईच्या पहिल्या पूर्णत: भूमिगत मेट्रो मार्ग ३ चे पहिल्या टप्प्याचे कामा सध्या अंतिम टप्प्यात आहे. कफ परेड ते आरे पर्यंत २७ स्थानकां द्वारे हा मेट्रो मार्ग जोडला गेला आहे. ही मार्गिका बीकेसी, विमानतळ टर्मिनल १ आणि टर्मिनल २, वरळी, दादर, सिद्धिविनायक, सीएसएमटी, चर्चगेट, हुतात्मा चौक आणि विधान भवन यांसारख्या शहरातील प्रमुख ठिकाणांना जोडते.भारतातील इतर मेट्रो मार्गिकांच्या तुलनेत मेट्रो मार्ग ३ सर्वाधिक प्रवाशांच्या पसंतीस उतरेल असे अपेक्षित आहे.

बाह्य जाहिराती करिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली ज्यामध्ये सहा कंपन्यांनी सहभाग घेतला यामध्ये टाईम्स ooh ही कंपनी विजेती ठरली. *(समाप्त)*

**For further information please contact: -**


**Vaidehi Khadse**

**9028543087**

**vaidehi.more@mmrcl.com**

**Niti Tamse**

**8369727364**

**niti.tamse@mmrcl.com**